## निशाणी क्र. ५ वर आदेश पारीत

अर्ज,प्रतिवादी यांनी दाखल केलेला लेखी जबाब व म्हणणे तसेच दावा व दाव्यातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. **थोडक्यात वादीचे असे म्हणणे की–**

मिळकत 'अ' तुकडी जिल्हा धुळे पैकी पोट तुकडी तालुका साक्री पैकी मौजे म्हसदी प्र.नेर, ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत क्र. ७११ (सि.स.नं. ६९७) बखळ जागा, एकूण क्षेत्रफळ ४७.५० चौ.मी. पैकी दक्षिणेकडील भाग क्षेत्रफळ २३.७५ चौ.मी. असून वापर पूर्वेस व दक्षिणेस आहे. यासी चतुःसिमा येणे प्रमाणे,

| | |
|---|---|
| पूर्वेस रस्ता | पश्चिमेस सि.स.नं. ६९६ |
| दक्षिणेस रस्ता | उत्तरेस सि.स.नं. ६९७ पैकी उर्वरीत |

येणेप्रमाणे वर्णन केलेली बखळ जागा मिळकत वादी व प्रतिवादी यांचे मालकी हक्काची व वडिलोपार्जित व कब्जे उपभोगात असलेली मिळकत होय.

मिळकत 'ब' तुकडी जिल्हा धुळे पैकी पोट तुकडी तालुका साक्री पैकी मोजे म्हसदी प्र.नेर, ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत क्र. ७११ (सि.स.नं. ६९७) बखळ जागा, एकूण क्षेत्रफळ ४७.५० चौ.मी. पैकी दक्षिणेकडील भाग क्षेत्रफळ २३.७५ चौ.मी. असून वापर पूर्वेस व दक्षिणेस आहे. यासी चतुःसिमा येणे प्रमाणे,

पूर्वेस रस्ता पश्चिमेस सि.स.नं. ६९६

दक्षिणेस सि.स.नं. ६९७ पैकी उर्वरीत उत्तरेस सि.स.नं. ६९८

३. या मिळकती, यास सोयीचे व्हावे म्हणून यापुढे दावा मिळकत असे संबोधण्यात येईल. वादी क्र. १ चा विवाह अशोक पंडीत सोनवने(सुतार), यांच्याशी झालेला आहे. त्यांना चंद्रकांत व प्रशांत वादी क्र. २ व ३ ही मुले आहेत. त्यांना एक मुलगी होती. ती मयत झाली आहे. पंडीत दौलत सोनवणे (सुतार), वादी क्र. १ चे सासरे होते. पंडीत दौलत सोनवणे (सुतार), यांना अशोक व दोन मुली रंजना व शोभा या आहेत. दावा मिळकती या पंडीत दौलत यांच्या वडीलोपार्जित असून त्यांना त्यांच्या वडीलांकडून आले आहेत. वादी यांनी वंशावळ नमुद केली.

४. रंजना हिचा विवाह झाला नसल्याने ती अविवाहीत आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या आईचे नांव शोभाबाई माधव जाधव, असे होते. वादी क्र. १ चे सासरे पंडीत दौलत सोनवणे (सुतार), हे दिनांक ०७.०३.२००९ रोजी मयत झाले. प्रतिवादी क्र. १ व २ ची

आई शोभाबाई ह्या देखील मयत आहे. वादी क्र. १ चे पती हे २००५ मध्ये मयत झाले. वाद मिळकत 'अ' व 'ब', मिळकत क्र. ७११ ची नमुना क्र. ८ ला ग्रामपंचायतमध्ये नोंद आहे. सदर जागा सिटी सर्वेला असल्याने तिचा सि.स.क्र. ६९७ आहे. तिचे क्षेत्रफळ ४७.५० चौ.मी. आहे. सदरची मिळकत ही पंडीत दौलत सोनवणे, यांची वडीलोपार्जित होती.

५. प्रतिवादी क्र. १ चे लग्नापूवीर्चे नांव नुतन माधव सुतार, असे होते. प्रतिवादी क्र. २चे लग्नापूवीर्चे नांव रेखा माधव सुतार असे होते. पंडीत दौलत सोनवणे (सुतार), हे प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या आईचे वडील होते. पंडीत दौलत सोनवणे (सुतार), यांनी २००८ मध्ये प्रतिवादी क्र. १व २ हे अज्ञान असल्याने, प्रतिवादी क्र. १ ची अ.पा.क. म्हणून शोभा पंडीत सोनवणे (सुतार), व प्रतिवादी क्र. २ ची अ.पा.क. शोभा पंडीत सुतार, या नावाने ग्रामपंचायत मिळकत क्र. ७११ व सि.स.क्र. ६९७ च्या मिळकतीपैकी उत्तरेकडील एकूण क्षेत्रफळ २३.७५ चौ.मी., प्रतिवादी क्र. १ च्या नावाने व दक्षिणेकडील क्षेत्र २३.७५ जागा प्रतिवादी क्र. २ च्या नावे खरेदीखत करुन दिले. दोन्ही खरेदीखत हे बेकायदेशीर खोटे व बनावट आहेत. पंडीत दौलत सोनवणे, सुतार हे सुशिक्षीत होते. त्यांना वाचता लिहिता येत होते. परंतू ते वयोवृध्द असल्याने सतत आजारी असायचे. या गोष्टीचा गैरफायदा घेऊन दिनांक १५.१०.२०१८ रोजी एकाच दिवशी दस्त क्र.२४४७/२००८ व दस्त क्र. २४४८/२००८ हा नोंदवून घेतला. यामध्ये वादींचा हिस्सा आहे.

६. वादी हे सटाणा, येथे राहतात, त्यामुळे वादी यांना कोणतीही कल्पना न देता खरेदीखत नोंदवून घेतले. पंडीत दौलत सोनवणे, सुतार यांचा सांभाळ वादी यांनी केला. सदर जागेची उता–याची आवश्यकता भासल्याने वादी यांनी ग्रामपंचायत कार्यालयात गेले असता, त्यांना मालकी हक्कामध्ये प्रतिवादी यांचे नांव आढळून आले. त्यानंतर त्यांनी प्रतिवादी यांना नोटीस पाठवली. नोटीस ही दिनांक २६.०८.२०१९ रोजी पाठविली. सदरची नोटीस ही प्रतिवादी यांना मिळाली परंतू त्यांनी काहीही कार्यवाही केली नाही.

७. सबब वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला व त्यामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला. वादी यास सकृतदर्शनी चांगली केस आहे. तसेच न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. सर्व बाबींचा विचार करता मनाई हुकूम न मिळाल्यास वादीचे नुकसान होईल. सबब त्यांनी अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

८. प्रतिवादी यांनी वादीच्या अर्जास पुरजोर विरोध केला. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. २१ अन्वये खुलासा दाखल केला. त्यांना वाद पत्रातील सर्व कथन विवेक्षितपणे नाकारले. मयत पंडीत दौलत सोनवणे, यांना पैशांची गरज असल्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या लाभत दिनांक १५.१०.२००८ रोजी खेरेदीखताद्वारे दावा मिळकत ही विकलेली आहे. तेव्हापासून वाद मिळकत ही प्रतिवादी यांच्या ताब्यात आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे मालेगांव येथे वास्तव्य करतात. रंजना पंडीत सोनवणे, यांना दाव्यात सहभागी केले नाही.

वादी यांनी तिच्या वेडसरपणाचा फायदा घेऊन हाताशी धरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मिळकतीचे हस्तांतरण हे १२ वर्षांपूर्वी झाले आहे. दावा हा अर्धवट स्वरूपाचा असून मुळ मालकाविरुध्द वादीस मनाई हुकूम मागण्याचा अधिकारी नाही, सबब अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

९. प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.क्र. २५ अन्वये लेखी जबाब दाखल केला. त्यांनी सुध्दा दाव्यातील सर्व कथन नाकारले आणि अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती केली. त्यामुळे अशा परिस्थितीत तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र नाही व अर्ज खारीज करावा अशी त्यांनी विनंती केली.

खालीलप्रमाणे मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | नाही |
| २ | सुविधेची तौलनीक बाजु वादीचे हक्कात आहे काय ? | नाही |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे न भरुन निघाणारे नुकसान होईल काय ? | नाही |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेश प्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबत –</u>

१०. मुद्दा क्र.१ ते ३ हे ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे,विवेचन करणे सोईचे व्हावे म्हणुन व लेखनाची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी सदर मुद्दे विवेचनाकरिता एकत्रीत घेण्यात आले. प्रतिवादी क्र. ३ ही दरम्यानच्या काळात मयत झाली. वादी यांच्यातर्फे लेखी युक्तीवाद हा नि.क्र. ३० अन्वये अभिलेखावर दाखल करण्यात आला.

११. वादी यांनी त्यांची भिस्त खालील दस्तऐवजांवर ठेवलेली आहे. १) नि.क्र. ३, दस्तावेज क्र.१– खरेदी खत क्र. २४४७/२००८, २) नि.क्र.३, दस्तावेज क्रं.२– खरेदीखत प्रत २४४८/२००८, ३) नि.क्र.३, दस्तावेज क्र.३– वादी यांनी प्रतिवादी यांना दिलेली नोटीस, ४) नि.क्रं.३, दस्तावेज क्रं.४–७ नोटीसची पोचपावती ५) पंडीत दौलत सोनवणे यांचे मृत्यूचे प्रमाणपत्र, इत्यादी दस्तावेज दाखल केले. प्रतिवादी यांच्यातर्फे देखील दस्तावेज दाखल करण्यात आले, ते म्हणजे मालमत्ता क्र. ७११ चे असेसमेंट लिस्ट तसेच कर बद्दलची पावती एकूण चार.

१२. वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद नि.क्र. ३० अन्वये दाखल केला. यामध्ये तुर्तातूर्त मनाई हूकूमाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी युक्तीवाद दाखल केल्याचा दिसून येतो. परिच्छेद क्र. ५ मध्ये त्यांनी तारीख १५.१०.२००८ नमुद केल्याचे दिसून येते. परंतू तुर्तातुर्त

मनाई हूकूम अर्जात तारीख १५.१०.२०१८ नमुद केल्याचे दिसते. यामध्ये अ.पा.क. म्हणून प्रतिवादी क्र. १ शोभा पंडीत सोनवणे (सुतार), असे नांव आहे, लेखी युक्तीवादामध्ये सुध्दा तेच नांव आहे. प्रतिवादी क्र. २ ची अ.पा.क. म्हणून अर्जात शोभा पंडीत सुतार असे नांव आहे, परंतू लेखी युक्तीवादात रंजना पंडीत सुतार, असे नांव आहे.

१३. दस्तावेज नि.क्र. ३ दस्तावेज क्र. १ चे अवलोकन केले असता हे दिनांक १५.१०.२००८ चो नोंदणीकृत खरेदीखत आहे. हे नुतन माधव सुतार, हिच्या लाभात करुन दिले आहे. अ.पा.क. म्हणून रंजना पंडीत सुतार, असे नांव आहे. नि.क्र. ३ दस्तावेज क्र. २ हे रेखा माधव सुतार हिच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत आहे. अ.पा.क. म्हणून शोभा पंडीत सुतार सोनवणे, यांचे नांव नमुद आहे. याठिकाणी मिळकतीचा त्रयस्त किंवा कोणतीही प्रकारे विक्री, गहाण, तारण, दान, खेरेदी विक्री सौदा करु नये याबाबतचा मनाई हूकूम मागितला आहे. परंतू नि.क्र. ५ च्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुध्द मनाई हूकूम मागितला आहे. प्रतिवादी क्र. १ ही रेखा व २ ही नुतन आहे. वादी यांनी रेखा व नुतर यांची आई शोभा होती, असे कथन केले. परंतू दस्तावेज नि.क्र. ३ दस्तोवज क्र. १ यामध्ये नुतनची अ.पा.क. रंजना बाप पंडीत सुतान सोनवणे, आहे असे दिसून येते आणि रेखाची अ.पा.क. शोभा बाप पंडीत सोनवणे, दिसून येते. वादी यांना मनाई हूकूम यांना प्रतिवादी यांना त्रयसत अधिकारी प्रस्तापित करु नये यासाठी हवा आहे. परंतू ते त्रयस्त अधिकार करण्याच्या तयारीत आहे किंवा नाही याबाबत अभिलेखावर काहीही कथन नाही.

तसेच ते प्रस्तापित करत आहे याबाब देखील दस्तावेज नाही. मिळकत ही नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरीत केली गेली असे दिसून येते. वादी यांनी प्रथम दर्शनी केस शाबीत करणे आवश्यक आहे. परंतू अभिलेखावर तसे कोणतेही दस्तावेज दिसून येत नाही. याउलट वादी यांचे लेखी जबाब आणि अर्जातील कथन हे विसंगत आहे.

१४. दावा हा खरेदीखत रद्द करुन मिळणेसाठी वाटणीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी त्यांची सकृतदर्शनी केस कशी हे अभिलेखावरुन दिसून येत नाही. तसेच वादी यांचे काय नुकसान होणार आहे, हे सुध्दा वादी यांनी अभिलेखावर कथन केले नाही, किंवा त्याबाबत दस्तावेज दाखल केले नाही. अशा एकंदरीत परिस्थितीवरुन अर्ज हा मंजुर होण्यास पात्र नाही असे माझे मत नोंदवितो. सबब मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ साठी</u>**

१५. मागील मार्च महिन्यापासून कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी न्यायालयीन कामकाजासाठी परिपत्रक निर्गमीत केले. सद्या मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सूरू झाले आहे. त्यामुळे कॉष्ट/ खर्चाबाबतचा आदेश हा याठिकाणी मी करीत नाही. सबब मी खालील

प्रमाणे आदेश पारीत करतोस.

**<u>आदेश</u>**

- अर्ज नामंजुर करण्यात येतो.
- आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला.

दि.२३.०८.२०२१
साक्री

(रा.भा.डोळे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
साक्री

**<u>:प्रमाणपत्र:</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक २५.०८.२०२१.

स्वाक्षरीत/–
लघुलेखक श्रेणी –३